**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.६९/इमारती-२**
मादाम कामा मार्ग, हूतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ३१ मे, २०१८

**<u>वाचा</u>**-१) शासन निर्णय क्र.सीएटी १०९०/सीआर-२१/इमारती-२, दि.२/२/१९९६
२) शासन निर्णय क्र.सीएटी १०९६/सीआर-३४८/इमारती-२, दि.३/३/१९९७
३) शासन निर्णय क्र.सीएटी १०९७/सीआर-४२/इमारती-२, दि.२०/१०/२००३
४) शासन निर्णय क्र.सीएटी १०९७/सीआर-४२/इमारती-२, दि.११/२/२००४
५) शासन निर्णय क्र.सीएटी २००६/सीआर-१४१/इमारती-२, दि.६/२/२००७
६) शासन निर्णय क्र.सीएटी ०१/२००६/सीआर-१४१/इमारती-२, दि.८/२/२००७
७) शासन निर्णय क्र.सीएटी ०१/०६/प्र.क्र.१४१/इमारती-२, दि.२५ ऑगस्ट २०१४

**<u>प्रस्तावना-</u>**

शासन निर्णय दि.२५ ऑगस्ट २०१४ अन्वये बेरोजगार अभियंत्यांच्या पंजीकरणाची मुदत १० वर्षे तसेच नोंदणी वर्ग-५ मध्ये ५० लक्ष रकमेची कामे देण्यात आली होती. तसेच स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना रु.७५ लक्ष किमतीपर्यंतची कामे विनास्पर्धा देण्यात येत होती. तसेच निवास्पर्धा देण्यात येणा-या कामाची कमाल रु.२०.०० लक्ष एवढी सिमित ठेवण्यात आली होती.

२. वरील मर्यादा कालमर्यादेनुसार वाढविण्याबाबतची मागणी विविध बेरोजगार संघटनांनी शासनाकडे केली होती. त्यानुषंगाने दिनांक १८/०१/२०१८ रोजी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचे दालनात बेरोजगारांच्या विविध समस्या व मागण्यांवर बैठक घेण्यात आली. सदरील बैठकीस विविध सुशिक्षित बेरोजगार अभियंता संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

३. त्यावर सहानुभूतिपूर्वक विचार करुन राज्यातील उच्च शिक्षित अभियंत्यांच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग शासनाच्या कामांमध्ये होवून सा.बां.विभागातील कामे उत्तम व दर्जेदार होण्याच्या दृष्टीने शासन खालील निर्णय घेत आहे :-

३.१ स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना प्रथम नोंदणी वर्ग ४ प्रमाणे म्हणजे रु.१५० लक्ष पर्यंतची देण्यात यावीत. या पंजीकरणाची मुदत १० वर्षे राहील. जे सुशिक्षित बेरोजगार अभियंता नोंदणीकृत आहेत, त्यांचा नोंदणीच्या उर्वरित कालावधीसाठी देखील रु.१५० लक्षपर्यंतची कामाची मर्यादा ठेवण्यात येत आहे.

३.२ तसेच स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना रु.७५ लक्ष किंमतीपर्यंतची कामे विनास्पर्धा देण्यात येत होती. त्यात आता वाढ करुन सदरील मर्यादा रु.१०० लक्ष पर्यंत करण्यात येत आहे. तसेच विनास्पर्धा देण्यात येणा-या कामाची कमाल मर्यादा २० लक्ष वरुन रु.३० लक्षपर्यंत करण्यात

येत आहे. ज्यांनी रु.१५ लक्ष किंमतीचे काम यशस्वीरित्या केले आहे त्यांना सदर सवलत उपलब्ध राहील.

३.३ ज्या सुक्षिशित बेरोजगार अभियंता यांना १० वर्षांच्या कालावधीत रु.१००.०० लक्ष रकमेची कामे विनास्पर्धा देण्यात आली नसतील अशा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांची मूळ १० वर्षे पर्यंतची नोंदणी मर्यादा त्यांच्या रु.१००.०० लक्ष रकमेचा कोटा पूर्ण होईपर्यंत किंवा पुढील ५ वर्षापर्यंत वाढविण्यात येत आहे.

३.४ सुक्षिशित बेरोजगार अभियंत्यांनी प्रत्येक ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतांना सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रातील “बंधपत्र” सादर करणे आवश्यक आहे.

४. वरील बाबी वगळता यापूर्वी काढण्यात आलेले शासन निर्णय व परिपत्रकातील इतर बाबी तशाच कायम राहतील. तसेच कामाची गुणवत्ता, दर्जा, कामाचा टिकाऊपणा यामध्ये कोणतीही तडजोड होणार नाही, शासनाचे आर्थिक नुकसान अथवा निधीचा अपव्यय होणार नाही, तसेच समाजहिताची पुरेपूर काळजी घेतली जाईल हे पाहण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिका-यांची राहील.

५. सदर आदेश जलसंपदा विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११०३२३४५०१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay Uttarwar

Digitally signed by Sanjay Uttarwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cab21a54ad660ded981a3eca61380e321e245c3a783fe22e29d3e1080185a683, serialNumber=23844598153e02b0343bb8841e656191857a573661abb05577db911eb5e3ded7, cn=Sanjay Uttarwar
Date: 2018.06.01 10:31:39 +05'30'

**(सं.मु.उत्तरवार)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति-**

१) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री (सा.बां.), यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री (जलसंपदा), यांचे खाजगी सचिव
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) महालेखापाल, लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८) सचिव (रस्ते)/सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी**

१) सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग

२) मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकारण, मुंबई, महाराष्ट्र

३) गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई

४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

५) व्यवस्थापकीय संचालक, शहर औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)

६) निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई

७) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ

८) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई

९) आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतीसह)

१०) सर्व कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा

११) सर्व अधीक्षक अभियंता/सर्व कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग

१२) सर्व अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

१३) अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी

१४) संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई

१५) महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशन, एचपी नं.९.७.९१, हैदरबाग नं.१, देगलूरनाका, नांदेड-४३१६०४

१६) सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषदा

१७) सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग, मंत्रालय

१८) निवडनस्ती (इमारती-२) कार्यासन

**सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी/ई-निविदेत भाग घेताना प्रत्येक कामासोबत सादर करावयाचे बंधपत्र**

**“ बंधपत्र ”**

मी,------------------------------------------------------------ शपथ पत्र लिहून देतो की, माझी सुशिक्षित बेरोजगार अभियंता अंतर्गत वर्ग-४ मधील नोंदणी दि.                 पर्यंत ग्राहय आहे. सद्य:स्थितीत मी कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/ खाजगी संस्थेत कार्यरत नाही. तसेच मी कोणतेही पुढील शिक्षण घेत नसून सदर काम मी स्वत: करणार आहे.

उपरोक्त बाबतीत असत्यता आढळून आल्यास होणा-या कार्यवाहीस मी व्यक्तिश: जबाबदार राहील.

असत्यतेमुळे माझी सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून नोंदणी रद्द करण्यात आल्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

सही-

नाव-